Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

बनावट देशी दारू कारखान्यावर छापा

(पान २ वर)



। शनिवार, दि. २० जून २०२६ । वर्ष १ । अंक ७४ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

### बेकायदा भरतीतून १६.८५ लाखांची वसुली

नाशिक| प्रतिनिधी : धुळे येथील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत गट तंत्रज्ञान व्यवस्थापक (बीटीएम) आणि सहायक तंत्रज्ञान अधिकारी (एटीएम) पदांच्या भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता केल्याप्रकरणी तत्कालीन प्रकल्प संचालक तथा सेवानिवृत्त अधिकारी बबन नथ्थु पाटील यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई केली आहे. बेकायदा भरती करून उमेदवारांकडून तब्बल १६ लाख ८५ हजार रुपये उकळल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यासह विविध फौजदारी कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सखोल चौकशीत भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शुक्रवारी (१९ जून) उशिरा मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

### आमदार-नगरसेवकही फुटतील, मंत्री गुलाबराव पाटलांचा दावा

# ‘उद्धव ठाकरेंना आणखी मोठा धक्का बसणार’

## शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या मेळाव्यात ठाकरे, आदित्य ठाकरे आणि राऊत यांच्यावर जोरदार टीकास्त्र

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : शिवसेनेच्या हिरकमहोत्सवी 60 व्या वर्धापन दिनानिमित्त गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये आयोजित मेळाव्यात राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षावर जोरदार हल्लाबोल करत आगामी काळात आणखी आमदार आणि नगरसेवक शिंदे गटात येतील, असा दावा केला.**

द्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावरही त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. भाषणाच्या सुरुवातीलाच गुलाबराव पाटील म्हणाले की, “वर्धापन दिनाचा हिरकमहोत्सवी 60 हा केवळ आकडा नाही, तर तो संस्कार, निष्ठा आणि संघर्षाचा आधार आहे.” 1986 मध्ये शिवसेनेत प्रवेश केल्यापासून मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी आणि हिंदुत्वाच्या विचारांसाठी काम करत असल्याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. 2019 नंतरच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका केली.



“समविचारी पक्षांपासून फारकत घेऊन ज्यांच्या विचारांना विरोध केला त्यांनाच ‘आय लव्ह यू’ म्हटले गेले.

घरातून ऑनलाइन सत्ता चालवली गेली आणि कार्यकर्त्यांना दूर ठेवले गेले. त्यामुळेच बंड झाले,” असा आरोप त्यांनी केला. ‘एकनाथ शिंदे महाराष्ट्राचा टायगर’ गुवाहाटीतील बंडाचा उल्लेख करताना पाटील म्हणाले, “त्या काळात ‘40 रेडे मुंबईत आले तर कापले जातील’ असे म्हटले गेले होते. पण आम्ही मुंबईत आलो आणि सत्ता स्थापन करून दाखवली. एकनाथ शिंदे कोण आहेत, हे महाराष्ट्र आणि देशाने पाहिले. ते महाराष्ट्राचे टायगर आहेत.” आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर निशाणा आदित्य ठाकरे यांचा उल्लेख ‘सोन्या’ असा करत गुलाबराव पाटील यांनी, “आमदारांची नाराजी वेळेत दूर केली असती आणि गावागावात जाऊन संवाद साधला असता, तर आजची परिस्थिती उद्भवली नसती,” अशी टीका केली.

याचवेळी त्यांनी संजय राऊत यांच्यावरही जोरदार शब्दांत हल्लाबोल केला. “राऊतांना मराठीत बोलता येते, पण माझी अहिराणी शिवी ऐकली तर चार दिवस जागेवरून उठणार नाहीत,” असे वक्तव्य करत त्यांनी राऊतांचा एकेरी उल्लेख केला. ‘आता विधानसभेचा दणका आणि महापालिकेचा चटका’ आगामी राजकीय घडामोडींवर भाष्य करताना मंत्री पाटील यांनी मोठा दावा केला. “हा छोटासा झटका आहे. विधानसभेचा मोठा दणका अजून बाकी आहे. त्यानंतर महापालिकेचा मोठा चटका देण्याची तयारी सुरू असून तो एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नक्की दिला जाईल,” असे ते म्हणाले.

### राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा उल्लेख करत, “शिवसेना वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे बाळासाहेबांचा आशीर्वाद त्यांच्यासोबत आहे,” असेही नमूद केले. शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या या वक्तव्यांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले असून आगामी काळातील राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# “ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है”

## ‘कुत्रे झुंडीनं येतात : उपमुख्यमंत्री शिंदे

**जन सम्राट टाईम्स**



**मुंबई | प्रतिनिधी:** शिवसेनेच्या हिरकमहोत्सवी ६० व्या वर्धापनदिनानिमित्त गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये आयोजित मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘ऑपरेशन टायगर’च्या चर्चेवर सूचक भाष्य करत राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फोडले. “ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है,” या एका वाक्याने त्यांनी आगामी राजकीय घडामोडींचे संकेत दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नऊ खासदारांपैकी सहा खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चांना उधाण आले असतानाच, वर्धापन दिनाच्या व्यासपीठावरून शिंदे काय घोषणा करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, त्यांनी कोणत्याही पक्षप्रवेशाची औपचारिक घोषणा न करता आपल्या भाषणातून सूचक संदेश दिला. ‘आज अनेकांच्या नजरा आमच्याकडे लागल्या आहेत’ भाषणादरम्यान एकनाथ शिंदे म्हणाले, “आज अनेकांच्या नजरा आपल्याकडे लागल्या आहेत. मी काय बोलणार, व्यासपीठावर कोण येणार, याची उत्सुकता सर्वांना आहे. पण आज हा टायगर तुमच्यासमोर उभा आहे. ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है.” त्यांच्या या वक्तव्यानंतर आगामी काळात आणखी काही राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ‘४० वरून ६० आमदारांपर्यंतचा प्रवास’ आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले, “माझ्यासोबत शिवसेनेचे ४० आमदार आले आणि आज ती संख्या ६० वर पोहोचली आहे. आज शिवसेना राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे. हे पाहून बाळासाहेब ठाकरे यांनाही आनंद होत असेल.” ते पुढे म्हणाले की, “बाळासाहेब केवळ नावात असून चालत नाहीत, तर त्यांच्या विचारांचे आणि कार्यपद्धतीचे पालनही झाले पाहिजे.

# ‘आता ऑपरेशन कमळ राबवणार’; उद्धव ठाकरेंची गर्जना, भाजपवर जोरदार हल्लाबोल

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** शिवसेनेच्या हिरकमहोत्सवी ६० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि राज्यातील सत्ताधारी नेतृत्वावर जोरदार टीकास्त्र सोडत “आता ऑपरेशन कमळ राबवावे लागेल” असा इशारा दिला. देशातील सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडत चालल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. लोकसभा निवडणुकीनंतर शिवसेनेच्या नऊ खासदारांपैकी सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून अप्रत्यक्षपणे या घडामोडींवर भाष्य केले. एका व्यंगचित्रात सोन्याची चोरी करणारा चोर पोलिसांना म्हणतो, ‘साहेब, चोरी म्हणू नका, ऑपरेशन गोल्ड म्हणा.’ जर अशीच परिस्थिती राहिली, तर आम्हालाही ऑपरेशन कमळ राबवावे लागेल.” त्यांच्या



या वक्तव्याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, ते आगामी राजकीय रणनीतीचे संकेत मानले जात आहेत. ‘देश अराजकतेकडे वाटचाल करत आहे’ देशातील सध्याच्या राजकीय वातावरणावर चिंता व्यक्त करताना ठाकरे म्हणाले की, “लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे. ज्या पद्धतीने राजकारण सुरू आहे, ते पाहता देश अराजकतेकडे वाटचाल करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मी ज्योतिषी नाही, पण परिस्थिती पाहून हे सहज लक्षात येते.” निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी आरोप केला की, “वाटेल त्या मार्गाने निवडणुका जिंकल्या जात आहेत. काही ठिकाणी विरोधकांना उमेदवारी अर्जही भरू दिले जात नाहीत. एवढे करून देशाला कुठे नेणार आहात?” भाजपला ‘प्रेमळ सल्ला’ भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या एका वक्तव्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले, “देशात एकच पक्ष राहील, अशी मानसिकता धोकादायक आहे. ही वाटचाल ‘नो वन पार्टी, नो इलेक्शन’च्या दिशेने सुरू असल्याचे दिसते.” भाजपला उद्देशून त्यांनी, “तुम्ही आमचे मित्र होता, त्यामुळे प्रेमळ सल्ला देतो. या मार्गाने गेलात तर दीर्घकाळ सत्ता टिकणार नाही,” असेही म्हटले. ‘तरुणांना झुरळ म्हणणे योग्य नाही’ युवकांबाबत करण्यात आलेल्या कथित वक्तव्यावर टीका करत उद्धव ठाकरे म्हणाले, “ज्या देशात तरुणाईला झुरळ म्हटले जाते, त्या देशाचे भविष्य काय असेल? जर तरुण पेटून उठले तर कोणतेही सरकार टिकणार नाही.” शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या व्यासपीठावरून केलेल्या या आक्रमक भाषणामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे असून, ‘ऑपरेशन कमळ’ या विधानावर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावर ग्राहकांचा संताप

## धरणगावत महावितरणच्या जनजागृती बैठकीत जोरदार सवाल

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव| प्रतिनिधी :** धरणगाव येथे स्मार्ट मीटरबाबत महावितरणतर्फे आयोजित जनजागृती मोहिमेदरम्यान ग्राहकांनी विविध शंका उपस्थित करत तीव्र नाराजी व्यक्त केली. स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीसंदर्भात पारदर्शकता आणि ग्राहकांचा विश्वास महत्त्वाचा असल्याचे सांगत भाजपा नेते ॲड. संजय महाजन यांनी महावितरण अधिकाऱ्यांना धारेवर धरले. ग्राहकांची संमती न घेता मीटर बदलण्याची सक्ती सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. महावितरणच्या जनजागृती कार्यक्रमात उपकार्यकारी अभियंता राजेंद्र पाटील आणि सहाय्यक



अभियंता आर. बी. सराफ यांनी स्मार्ट मीटरचे फायदे उपस्थितांसमोर मांडले.

स्मार्ट मीटरमुळे अचूक वीज मोजणी, स्वयंचलित बिलिंग प्रणाली आणि ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती सहज उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या सादरीकरणानंतर उपस्थित ग्राहकांनी वाढीव वीज बिलाची भीती, प्रीपेड मीटरची शक्यता, मीटर बदलण्याची प्रक्रिया आणि ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बसविण्यात येणार का, अशा विविध मुद्द्यांवर अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी बोलताना ॲड. संजय महाजन यांनी स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ग्राहकांना संपूर्ण माहिती देऊन त्यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कोणत्याही प्रकारे नागरिकांवर स्मार्ट मीटर लादण्याचा प्रयत्न केल्यास धरणगावातील नागरिक लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीला शिवसेना गटनेते विनय भावे, शिरीष बयस, नगरसेवक विलास महाजन, अहमद पठाण यांच्यासह विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने वीज ग्राहक उपस्थित होते. कार्यक्रमात स्मार्ट मीटरविषयी जनजागृतीसोबतच ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करण्यात आला असला, तरी अनेक नागरिकांनी आपल्या शंका आणि आक्षेप कायम ठेवत अधिक स्पष्ट धोरणाची मागणी केली.

# महाजन यांची कथित छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांची एका तरुणीसोबतची कथित आक्षेपार्ह छायाचित्रे शुक्रवारी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित छायाचित्रे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करण्यात आली असावीत, असा संशय व्यक्त करण्यात आला असून या प्रकरणी जळगाव सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका फेसबुक खात्याद्वारे मंत्री गिरीश महाजन यांचे कथितपणे एआय तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले अथवा मॉर्फ केलेले छायाचित्र वापरत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक पोस्ट प्रसारित करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम 356 आणि 3(5) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम 66(सी) आणि 67 अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास करताना संबंधित सोशल मीडिया खात्याची माहिती, पोस्टचा मूळ स्रोत, ती तयार करणारी व्यक्ती आणि त्याच्या प्रसारामागील नेटवर्कचा शोध घेण्याचे काम सायबर पोलिसांनी हाती घेतले आहे. तसेच डिजिटल पुरावे संकलित करून तांत्रिक तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली. हा तपास पोलीस निरीक्षक सतीश गोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः या प्रकरणी पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केल्याची माहिती दिली आहे. त्यांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, तपासातून सत्य समोर येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच चौकशी पूर्ण झाल्यानंतर आपण या विषयावर सविस्तर





खुलासा करणार असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सोशल मीडियावर छायाचित्रे व्हायरल झाल्यानंतर विरोधी पक्षातील काही नेते आणि कार्यकर्त्यांनीही त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केल्याने या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटू लागले आहेत. मात्र, संबंधित छायाचित्रांच्या सत्यतेबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नसून तपास सुरू आहे. दरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट छायाचित्रे तयार करणे आणि त्याद्वारे व्यक्तींची बदनामी करण्याच्या वाढत्या घटनांबाबत सायबर पोलिसांनी चिंता व्यक्त केली आहे. नागरिकांनी सोशल मीडियावर प्रसारित होणारी कोणतीही माहिती अथवा छायाचित्रे पडताळणीशिवाय शेअर करू नयेत, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे. तपासादरम्यान दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरोधात कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे सायबर पोलिसांनी स्पष्ट केले असून, या प्रकरणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### सायबर पोलिसांनी चिंता व्यक्त केली

संबंधित छायाचित्रांच्या सत्यतेबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नसून तपास सुरू आहे. दरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट छायाचित्रे तयार करणे आणि त्याद्वारे व्यक्तींची बदनामी करण्याच्या वाढत्या घटनांबाबत सायबर पोलिसांनी चिंता व्यक्त केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 'एनटीए'च्या कथित भोंगळ कारभाराविरोधात काँग्रेस-NSUIचे तीव्र ‘रास्ता रोको’

## पेपर लीक प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीसह केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**शहादा | प्रतिनिधी :** नीट यूजी परीक्षेतील कथित पेपर लीक प्रकरण तसेच राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) यांच्या कार्यपद्धतीतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ युवक काँग्रेस आणि राष्ट्रीय विद्यार्थी संघटना (NSUI) यांच्या वतीने शहादा येथील प्रकाशा चौफुलीवर गुरुवारी तीव्र ‘रास्ता रोको’ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक जवळपास तासभर पूर्णपणे विस्कळीत झाली होती. महाराष्ट्रासह देशभरात वारंवार समोर येणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे प्रामाणिकपणे अभ्यास





करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. संतप्त कार्यकर्त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. सुमारे एक तास चाललेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले आणि शिष्टमंडळाने प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. शहादा तहसीलदार संभाजी पाटील, तालुका पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सोनवणे यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आलेल्या निवेदनात नीट पेपर लीक प्रकरणाची उच्चस्तरीय अथवा न्यायालयीन चौकशी करून दोषींवर तसेच संपूर्ण रॅकेटमधील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) च्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून संस्थेची पुनर्रचना करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी झालेल्या कथित अन्यायाची नैतिक जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष निलेश पाटील आणि NSUIचे जिल्हाध्यक्ष सागर पावरा यांनी केले. यावेळी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दीपक पटेल तसेच युवक काँग्रेस प्रभारी जयंतकुमार सोनवणे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या हितासाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रकाशा बसस्थानक परिसर, तळोदा चौफुली तसेच राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडले असले तरी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत सरकारने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

### पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले

लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले आणि शिष्टमंडळाने प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. शहादा तहसीलदार संभाजी पाटील, तालुका पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सोनवणे यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आलेल्या निवेदनात नीट पेपर लीक प्रकरणाची उच्चस्तरीय अथवा न्यायालयीन चौकशी करून दोषींवर तसेच संपूर्ण रॅकेटमधील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

# मंडाबाई भाले यांना न्याय मिळावा!

## मनपा मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावून ‘गेट बंद’ आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** जगन्नाथ नगर येथील रहिवासी मंडाबाई रघुनाथ भाले यांना न्याय मिळावा, त्यांच्या घरावरील कथित कारवाईची निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, या मागण्यांसाठी दक्ष पत्रकार संघ आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धुळे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावून ‘गेट बंद’ आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. आंदोलकांनी दिलेल्या माहितीनुसार, मंडाबाई भाले या गेल्या 70 ते 80 वर्षांपासून जगन्नाथ नगर परिसरात वास्तव्यास असून त्यांच्या घरावर अतिक्रमण नसतानाही स्थानिक पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय मालमत्तेचे नुकसान, मानसिक



छळ, जातीवाचक शिवीगाळ तसेच व्हॉट्सअॅप ग्रुपवर अपमानास्पद मजकूर प्रसारित केल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ मंडाबाई भाले यांनी 9 जून 2026 पासून आमरण उपोषण सुरू केल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. तसेच पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जबरदस्तीने जिल्हा रुग्णालयात दाखल केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यांच्या मुलगा ललित भाले यांनीही साखळी उपोषण सुरू ठेवले असल्याचे सांगण्यात आले. दक्ष पत्रकार संघ आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी असा आरोप केला आहे की, परिसरातील इतर कथित अतिक्रमणांवर कारवाई न करता निवडक नागरिकांवरच कारवाई करण्यात आली. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. संघटनांच्या म्हणण्यानुसार, 15 जूनपासून जेल रोड परिसरात धरणे आंदोलन सुरू असून, न्याय मिळत नसल्याने 19 जून रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावून ‘गेट बंद’ आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच मंडाबाई भाले किंवा आंदोलनकर्त्यांना कोणतीही जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांवर धुळे महानगरपालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### व्हॉट्सअॅप ग्रुपवर अपमानास्पद मजकूर

आंदोलकांनी दिलेल्या माहितीनुसार, मंडाबाई भाले या गेल्या 70 ते 80 वर्षांपासून जगन्नाथ नगर परिसरात वास्तव्यास असून त्यांच्या घरावर अतिक्रमण नसतानाही स्थानिक पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय मालमत्तेचे नुकसान, मानसिक छळ, जातीवाचक शिवीगाळ तसेच व्हॉट्सअॅप ग्रुपवर अपमानास्पद मजकूर प्रसारित केल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ मंडाबाई भाले यांनी 9 जून 2026 पासून आमरण उपोषण सुरू केल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. तसेच पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जबरदस्तीने जिल्हा रुग्णालयात दाखल केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यांच्या मुलगा ललित भाले यांनीही साखळी उपोषण सुरू ठेवले असल्याचे सांगण्यात आले. दक्ष पत्रकार संघ आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी असा आरोप केला आहे.

# बोगस खतांवर तात्काळ कारवाईची मागणी; संभाजी ब्रिगेडचे कृषी अधीक्षकांना निवेदन!

## जिल्ह्यात खत-बियाणांचा मुबलक पुरवठा करा

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यात बोगस बियाणे आणि बनावट खतांच्या विक्रीवर तात्काळ पायबंद घालावा, जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्रांवर शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात दर्जेदार खत व बियाणांचा पुरवठा सुनिश्चित करावा तसेच अवाजवी दराने खत विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेड आणि अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने जिल्हा कृषी अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संघटनांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात, दरवर्षी बोगस खत व बियाणांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वर्षभर मेहनत करून पीक उभे करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आशांवर अशा बनावट उत्पादनांमुळे पाणी फिरत असल्याने कृषी विभागाने याप्रकरणी अधिक सतर्क भूमिका घेण्याची गरज असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. यंदा पावसाचे आगमन लांबल्याने अनेक शेतकऱ्यांची पेरणी अद्याप प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत बाजारात बोगस बियाणे आणि बनावट खतांचा शिरकाव होण्याची शक्यता अधिक असल्याने कृषी विभागाने तातडीने विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

### दोषींवर कठोर कारवाई करावी

संघटनांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात, दरवर्षी बोगस खत व बियाणांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वर्षभर मेहनत करून पीक उभे करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आशांवर अशा बनावट उत्पादनांमुळे पाणी फिरत असल्याने कृषी विभागाने याप्रकरणी अधिक सतर्क भूमिका घेण्याची गरज असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. यंदा पावसाचे आगमन लांबल्याने अनेक शेतकऱ्यांची पेरणी अद्याप प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत बाजारात बोगस बियाणे आणि बनावट खतांचा शिरकाव होण्याची शक्यता अधिक असल्याने कृषी विभागाने तातडीने विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# बनावट देशी दारू कारखान्यावर छापा

## 10.17 लाखांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधातील मोहिमेत मोठी कारवाई करत बनावट देशी दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून तब्बल 10 लाख 17 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांच्या निर्देशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने म्हसावद पोलीस ठाणे हद्दीतील जुगनी गावातील दुगलीबारी पाड्यावर ही कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत एका घरात स्पिरीटचा वापर करून बनावट देशी दारू तयार केली जात असल्याची माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा झाल्यानंतर विशेष पथक तयार करून तातडीने छापा टाकण्यात आला. पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता संबंधित कौलारू घरातून स्पिरीटचा तीव्र वास येत असल्याचे निदर्शनास आले. खिडकीतून पाहणी केल्यानंतर एका व्यक्तीला दारूच्या बाटल्यांमध्ये द्रव पदार्थ भरताना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी घरात प्रवेश करून त्या व्यक्तीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव लक्ष्मण हात्या पाडवी (वय 31), रा.



तलावडी, ता. धडगाव, जि. नंदुरबार असे सांगितले. कारवाईदरम्यान पोलिसांनी 39 बॉक्स बनावट देशी दारू, 150 लिटर स्पिरीट, दारूच्या बाटल्यांचे बुच पॅकिंग करणारे इलेक्ट्रिक मशीन, दारू निर्मितीसाठी लागणारे विविध साहित्य तसेच एक बोलेरो चारचाकी वाहन असा एकूण 10 लाख 17 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) 2023 च्या कलम 123 तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम 65(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई सुरु राहणार

अवैध दारू निर्मिती आणि विक्रीविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, जिल्ह्यात अशा बेकायदेशीर धंद्यांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. खिडकीतून पाहणी केल्यानंतर एका व्यक्तीला दारूच्या बाटल्यांमध्ये द्रव पदार्थ भरताना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी घरात प्रवेश करून त्या व्यक्तीला ताब्यात घेतले.

# नशिराबादमध्ये वादळी वाऱ्याचा फटका

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** नशिराबाद येथील पोलीस स्टेशन परिसरात शुक्रवारी रात्री अचानक सुटलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे इंटरनेटची केबल तुटून चालत्या दुचाकीवर पडल्याने झालेल्या अपघातात एका तरुणाला गंभीर दुखापत झाली. किरण माळी (रा. नशिराबाद) असे जखमी तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, किरण माळी हे रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आपले काम आटोपून दुचाकीने घरी परतत होते.वाऱ्याच्या वेगामुळे रस्त्यावरील इंटरनेटची केबल तुटून थेट त्यांच्या चालत्या दुचाकीवर आली.या अनपेक्षित प्रकारामुळे त्यांचा वाहनावरील ताबा सुटला आणि ते रस्त्यावर कोसळले. या अपघातात त्यांच्या हाताच्या तळव्याला गंभीर दुखापत झाली असून तळवा कापल्याने रक्तस्रावही झाला. स्थानिक नागरिकांच्या मते, प्रसंगावधान राखल्यामुळे पुढील मोठी दुर्घटना टळली. मित्रांची तत्परता ठरली जीवदान देणारी अपघात होताच परिसरात उपस्थित असलेले धीरज सैतवाल आणि चेतन सपकाळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी किरण माळी यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. वेळेवर वैद्यकीय मदत मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. धोकादायक लोंबकळणाऱ्या केबल्सचा प्रश्न पुन्हा चर्चेत वादळी वाऱ्यामुळे हा अपघात घडला असला तरी शहरातील अनेक भागांत इंटरनेट व केबलच्या वायरी निष्काळजीपणे सैल आणि लोंबकळत्या अवस्थेत टाकण्यात आल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# जागतिक योग दिनानिमित्त धुळ्यात अनोखा ‘वॉटर योगा’; सत्तरपार ज्येष्ठांचा उत्स्फूर्त सहभाग

## जिल्हा क्रीडा संकुलाच्या जलतरण तलावात विविध जलयोगासनांचे सादरीकरण

जन सम्राट टाईम्स



**धुळे| प्रतिनिधी:** जागतिक योग दिनानिमित्त धुळे शहरात अनोख्या पद्धतीने ‘वॉटर योगा’चे आयोजन करण्यात आले. जिल्हा क्रीडा संकुलाच्या जलतरण तलावात पार पडलेल्या या विशेष उपक्रमात सत्तर वर्षांवरील शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेत पाण्यातील विविध योगासनांचे सादरीकरण केले.

त्यांच्या उत्साहपूर्ण सहभागाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन, आरएसएस गौशाळा, डोंगरे महाराज ग्रुप आणि धुळे पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या वॉटर योगा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वाढत्या वयातही निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी भारत सरकार मान्यताप्राप्त योग शिक्षक **डॉ. जगदीश गिंदोडिया** यांनी पाण्यातील योगाचे महत्त्व स्पष्ट करत नियमित वॉटर योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक संतुलन सुधारते, वजन नियंत्रणास मदत होते तसेच अनेक शारीरिक व्याधींवर सकारात्मक परिणाम होतो, अशी माहिती दिली. त्यांनी विविध ज्येष्ठ नागरिकांसह प्रत्यक्ष पाण्यात योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **बाळासाहेब बेलदार यांच्यासह महेश घुगे, मुन्ना गिंदोडिया, कैलास पसारी, अॅड. राजेंद्र निकुंभ, संजय गिंदोडिया, अॅड. आनंद जगदेव, मोहन बंग, सागर आघाव** आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या अनोख्या वॉटर योगा उपक्रमातून ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य, तंदुरुस्ती आणि सकारात्मक जीवनशैलीचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचवला.

# गुजरात-महाराष्ट्र सीमेवर राज्यस्तरीय दक्षता पथकाचा ‘सर्जिकल स्ट्राईक’!

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** गुजरातमधून महाराष्ट्रात सुरू असलेल्या अवैध इंधन आणि एलपीजी गॅस तस्करीविरोधात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने मोठी धडक कारवाई करत तब्बल 1 कोटी 55 लाख 95 हजार 114 रुपयांचा अवैध एलपीजी गॅस, डिझेल साठा, टँकर आणि वाहने जप्त केली आहेत. या कारवाईमुळे आंतरराज्यीय तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला असून संबंधित विभागात मोठी खळबळ उडाली आहे. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त




माहितीनुसार, गुजरात-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील साक्री तालुक्यातील दहिवल परिसरात अवैध इंधन साठवण आणि तस्करीचे काम सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने तातडीने कारवाई करत ‘अन्नपूर्णा धाब्या’च्या मागील परिसरात आणि ‘पार्श्वनाथ धाब्या’च्या शेजारी असलेल्या अड्ड्यावर छापा टाकला. छाप्यामध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडर, डिझेलचा साठा, दोन मोठे टँकर तसेच इतर वाहने आणि तस्करीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत 1 कोटी 55 लाख 95 हजार 114 रुपये असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, गुजरात राज्यातून स्वस्त दरात इंधन आणि एलपीजी गॅस महाराष्ट्रात आणून त्याची बेकायदेशीररीत्या विक्री केली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून तस्करीच्या संपूर्ण साखळीचा शोध घेण्यासाठी संबंधित यंत्रणांनी चौकशीची गती वाढवली आहे. राज्यस्तरीय दक्षता पथकाच्या या ‘सर्जिकल स्ट्राईक’मुळे इंधन तस्करीत सहभागी असलेल्या आंतरराज्यीय नेटवर्कमध्ये मोठी खळबळ उडाली असून, आगामी काळात अशा अवैध व्यवसायांविरोधात आणखी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत सूत्रांकडून मिळत आहेत.

# भुसावळ ऑर्डनन्स फॅक्टरीचा सामाजिक उपक्रम!

## दिव्यांगांना 95 लाखांच्या साहित्याचे वाटप



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी:** भुसावळ येथील ऑर्डनन्स फॅक्टरीने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत दिव्यांग नागरिकांना सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे मोफत सहाय्यक उपकरणे व सहाय्यक साधनांच्या वितरण शिबिराचे आयोजन केले. यंत्र इंडिया लिमिटेडचा एक घटक असलेल्या ऑर्डनन्स फॅक्टरी आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिरात 105 दिव्यांग लाभार्थ्यांना विविध सहाय्यक उपकरणांचे मोफत वितरण करण्यात आले. 15 जून 2026 रोजी शिरपूर येथील आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलात आयोजित या शिबिराला लाभार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमाअंतर्गत ऑर्डनन्स फॅक्टरी भुसावळने एकूण 715 दिव्यांग लाभार्थ्यांना सहाय्यक उपकरणे व साधनांचे वितरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून त्यासाठी सुमारे 95 लाख रुपयांचे साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 15 जून ते 23 जून 2026 या कालावधीत धुळे जिल्ह्यातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष शिबिरांद्वारे या साहित्याचे टप्प्याटप्प्याने वितरण केले जाणार आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन ऑर्डनन्स फॅक्टरीचे कार्यकारी संचालक निरंजन लाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाला धुळे विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशीराम पावरा, ऑर्डनन्स फॅक्टरीचे महाव्यवस्थापक डॉ. आर. एन. झा, कमलेश यादव तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि मोठ्या संख्येने दिव्यांग लाभार्थी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक निरंजन लाल यांनी ऑर्डनन्स फॅक्टरीच्या 200 वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा आढावा घेत भारतीय सशस्त्र दलांसाठी तयार करण्यात येणाऱ्या विविध उत्पादनांची माहिती दिली. बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात ऑर्डनन्स फॅक्टरीचे देशाच्या संरक्षण क्षेत्रातील योगदान अधोरेखित करत त्यांनी दिव्यांग नागरिकांना सक्षम बनविण्यासाठी सहाय्यक उपकरणांचे वितरण हा संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. भविष्यातही अशा लोककल्याणकारी उपक्रमांद्वारे सामाजिक जबाबदारी सातत्याने पार पाडली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# नशिराबादमधील ‘भिक्षा मागो आंदोलन’ तात्पुरते स्थगित

## झिपरू अण्णा महाराजांच्या नावाच्या मंजूर ठरावाच्या अंमलबजावणीची पुन्हा मागणी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** नशिराबाद शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराला परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव देण्याच्या मंजूर ठरावाची तातडीने अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी शुक्रवार (दि. 19 जून 2026) रोजी प्रस्तावित करण्यात आलेले ‘भिक्षा मागो आंदोलन’ तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. आंदोलनाचे आयोजक रोहित बाळू चौधरी यांनी याबाबत नशिराबाद नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना अधिकृत पत्र देऊन आंदोलन



स्थगित करण्याची माहिती दिली. नगर परिषदेत शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराला श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव देण्याचा ठराव यापूर्वीच मंजूर झाला आहे. मात्र, प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने या विलंबाच्या निषेधार्थ रोहित चौधरी यांनी 19 जून रोजी सकाळी 11 वाजता अनोख्या पद्धतीने ‘भिक्षा मागो आंदोलन’ करण्याचा इशारा दिला होता. मात्र, काही अपरिहार्य वैयक्तिक कारणे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नियोजित दिवशी आंदोलन करणे शक्य नसल्याने ते काही दिवसांसाठी स्थगित करण्यात आल्याचे चौधरी यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. आंदोलनाची पुढील तारीख लवकरच निश्चित करून प्रशासनाला अधिकृतपणे कळविण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. रोहित चौधरी यांनी प्रशासनाकडे मंजूर ठरावाची विलंब न करता अंमलबजावणी करण्याची मागणी केली असून, याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आगामी काळात लोकशाही मार्गाने अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. या संदर्भातील पत्राच्या प्रती जळगाव जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच नशिराबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनाही माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

### आंदोलनाची तारीख लवकरच कळविण्यात येईल

नगर परिषदेत शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराला श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव देण्याचा ठराव यापूर्वीच मंजूर झाला आहे. मात्र, प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने या विलंबाच्या निषेधार्थ रोहित चौधरी यांनी 19 जून रोजी सकाळी 11 वाजता अनोख्या पद्धतीने ‘भिक्षा मागो आंदोलन’ करण्याचा इशारा दिला होता. मात्र, काही अपरिहार्य वैयक्तिक कारणे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नियोजित दिवशी आंदोलन करणे शक्य नसल्याने ते काही दिवसांसाठी स्थगित करण्यात आल्याचे चौधरी यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. आंदोलनाची पुढील तारीख लवकरच निश्चित करून प्रशासनाला अधिकृतपणे कळविण्यात येईल.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306